DAY — 15 SEAT NUMBER

2020	III	09	1500	J-418	(M)

SOCIOLOGY (45)

Time : 3 Hrs. **(4 Pages)** **Max. Marks : 80**

सूचना : (१) सर्व प्रश्न सोडविणे अनिवार्य आहे.

(२) प्रश्न क्रमांक २ ते ५ मधील सर्व उपप्रश्नांच्या उत्तरांत किमान चार मुद्दे अपेक्षित आहेत.

(३) प्रत्येक प्रश्नाच्या उजवीकडे पूर्ण गुण दिलेले आहेत.

(४) प्रत्येक नवीन प्रश्नाचे उत्तर नवीन पानावर लिहावे.

प्र. १. (अ) खाली कंसांमध्ये दिलेल्या पर्यायांमधून योग्य पर्याय निवडून खालील विधाने पूर्ण करा : [१६] (८)

(१) प्राचीन काळात प्रत्यक्ष लोकशाही ही ------ मध्ये प्रचलित होती.
(ग्रीस / अमेरिका / रशिया / इंग्लंड)

(२) 'अकबरनामा' हा ग्रंथ ------- यांनी लिहिला.
(दारा शिकोहे / अबुल फजल / महमद जयसी / शहाजहान)

(३) कुलकर्णी वतन ------ यांनी नष्ट केले.
(राजर्षी शाहू महाराज / महात्मा जोतीबा फुले / डॉ. बाबासाहेब आंबेडकर / स्वामी दयानंद सरस्वती)

(४) सामाजिक संस्था ही सामाजिक ------ संच आहे.
(दर्जांचा / भूमिकांचा / नियमनांचा / समूहांचा)

(५) दूरचित्रवाणीचा शोध ------ यांनी लावला.
(मार्कोनी / चार्ल्स बॅबेज / डी फुगर्स / जे. एल. बेअर्ड)

https://www.maharashtrastudy.com

(६) स्वातंत्र्यानंतर भारताने ------ पद्धती स्वीकारली आहे.

(संघराज्य / अध्यक्षीय / हुकुमशाही / एकात्म)

(७) सर्वोदय चळवळ ------ यांनी सुरू केली.

(स्वामी विवेकानंद / आत्माराम पांडुरंग / महात्मा गांधी / पंडिता रमाबाई)

(८) कौटुंबिक हिंसाचार प्रतिबंधक अधिनियम ------ साली संमत केला.

(१९७७ / १९८५ / २००१ / २००५)

(ब) खालील 'अ' व 'ब' गटांतील योग्य जोड्या लावा : (४)

'अ' गट	'ब' गट
(अ) जात	(१) जैन धर्म
(ब) राष्ट्रीय एकात्मता समिती (१९६१)	(२) प्रादेशिक संघटना
(क) सार्क (SAARC)	(३) बौद्ध धर्म
(ड) त्रिपीटक	(४) जन्म
	(५) इंदिरा गांधी
	(६) बहुराष्ट्रीय महामंडळे

(क) खालील प्रश्नांची प्रत्येकी फक्त 'एका' वाक्यात उत्तरे लिहा : (४)

(१) भारतात प्रकाशित झालेल्या पहिल्या वृत्तपत्राचे नाव लिहा.

(२) विशेष विवाह अधिनियम कोणत्या साली संमत झाला?

(३) 'एकविवाह' म्हणजे काय?

(४) 'सत्यार्थप्रकाश' हा ग्रंथ कोणी लिहिला?

प्र. २. संक्षिप्त टिपा लिहा (कोणत्याही दोन) : [८]

(१) इंटरनेट

(२) जैन धर्माचा भारतीय समाजावरील प्रभाव

(३) ब्राह्मो समाज

https://www.maharashtrastudy.com

प्र. ३. खालील संज्ञांमधील फरक स्पष्ट करा (कोणतेही तीन) : [१२]

(१) आदिवासी समुदाय व ग्रामीण समुदाय

(२) केंद्र कुटुंब व संयुक्त कुटुंब

(३) वृत्तपत्र व चित्रपट

(४) भाषावाद आणि संप्रदायवाद

(५) व्यक्तिगत समस्या व सामाजिक समस्या

प्र. ४. खालील प्रश्नांची कारणे द्या (कोणतेही तीन) : [१२]

(१) भारतातील सर्व क्षेत्रांत स्त्री-पुरुष असमानता आढळते.

(२) नागरीकरण ही एक सामाजिक प्रक्रिया आहे.

(३) कुटुंबामध्ये संरचनात्मक बदल झालेले आहेत.

(४) महात्मा जोतीबा फुलेंनी स्त्री शिक्षणास चालना दिली.

(५) शिक्षण हे राष्ट्रीय एकात्मता वाढविण्याचे प्रभावी साधन आहे.

प्र. ५. खालील प्रश्नांची थोडक्यात उत्तरे लिहा (कोणतेही तीन) : [१२]

(१) विवाह संस्थेत घडून आलेले बदल सांगा.

(२) जनसंप्रेषण माध्यमांचा सामाजिक क्षेत्रावरील प्रभाव स्पष्ट करा.

(३) आधुनिकीकरणाच्या वैशिष्ट्यांची चर्चा करा.

(४) भारतातील विविधतेतील एकता विशद करा.

(५) जागतिकीकरणाची वैशिष्ट्ये स्पष्ट करा.

प्र. ६. खालीलपैकी कोणत्याही एका प्रश्नाचे सविस्तर उत्तर लिहा (शब्दमर्यादा सुमारे २५० शब्द) : [१०]

(१) लोकसंख्या वाढीचे परिणाम स्पष्ट करून लोकसंख्या वाढ नियंत्रणासाठीचे उपाय सुचवा.

(२) नागर समुदायाच्या आर्थिक समस्या स्पष्ट करा व त्या समस्या सोडविण्यासाठी उपाय सुचवा.

https://www.maharashtrastudy.com

प्र. ७. खालीलपैकी कोणत्याही <u>एका</u> प्रश्नाचे सविस्तर उत्तर लिहा (शब्दमर्यादा सुमारे २५० शब्द) : [१०]

(१) डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या सामाजिक कार्यांची चर्चा करा व त्या कार्याचा भारतीय समाजावर पडलेला प्रभाव स्पष्ट करा.

(२) औद्योगिकीकरणाच्या वैशिष्ट्यांची चर्चा करून भारतीय समाजावरील त्याच्या प्रभावाबद्दल लिहा.

◆◆◆

https://www.maharashtrastudy.com
Whatsapp @ 9300930012
Send your old paper & get 10/-
अपने पुराने पेपर्स भेजे और 10 रुपये पायें,
Paytm or Google Pay से